"स्टँड अप इंडिया योजनेचा अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासातील योगदानाचा तुलनात्मक अभ्यास
(विशेष संदर्भ: लातूर व नांदेड जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत "अर्थशास्त्र" विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधनपूर्व आराखडा

संशोधक

देवकरे किरण निवृत्ती

मार्गदर्शक

डॉ. ठाकूर विलास तुळशीराम

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर.

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

"स्टँड अप इंडिया योजनेचे अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासातील योगदानाचा तुलनात्मक अभ्यास (विशेष संदर्भ लातूर व नांदेड जिल्हा)

प्रस्तावना:

भारताच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करत असताना भारतीय समाज व्यवस्था जाणून घेणे महत्त्वाचे ठरते यानुसार भारतामध्ये विविध जाती धर्माचे नागरिक वास्तव्यास आहेत या नागरिकांच्या सर्वांगीण विकासाची सर्वस्वी जबाबदारी भारतीय **राज्य घटनेने** भारतीय शासन कर्त्यांना दिलेली आहे. या धोरणाचा वापर करत भारत सरकारने २०१६ साली अनुसूचित जाती, जमाती व महिला यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्टँड अप इंडिया नावाची योजना सुरू केली. ही योजना अनुसूचित जाती आणि जमातीच्या सामाजिक व आर्थिक विकासाला चालना देण्यारी असल्यामुळे प्रस्तुत "स्टँड अप इंडिया योजनेचे अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासातील योगदानाचा तुलनात्मक अभ्यास (विशेष संदर्भ लातूर व नांदेड जिल्हा)"

संशोधन विषयाचा अभ्यास करण्यात येणार .

अनुसूचित जाती व जमाती संकल्पना

भारत देश विविधतेने नटलेला देश असल्याकारणाने भारतामध्ये विविध जाती, जमाती, पंथ, धर्म, वंशाचे लोक वास्तव्य करतात. त्यांच्या उद्धारासाठी भारत सरकार नेहमी विविध विकासात्मक योजनांची आखणी करत असतो त्यामध्ये सर्व नागरिकांना आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक इत्यादी हक्क मिळतात. परंतू भारत एकविसाव्या शतकाच्यामध्ये येऊन देखील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय मागासलेल्या वर्गाचे प्रमाण अधिक आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख प्रामुख्याने होत असून त्या मुख्ये प्रवाहापासून आता देखील वंचितच आहेत.

सुरूवातीला अनुसूचित जातींचा उल्लेख 'अस्पृश्य' या शब्दाने करत असत. अस्पृशता नष्ट करण्याच्या उद्देशाने अनेक समाजसुधारकाने प्रयत्न केले त्यात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'मानवी अस्पृश्य' असा शब्दप्रयोग काही काळ केला, त्यानंतर १९०६ साली 'निराश्रित' हा शब्द वापरला. 'डिप्रेस्ड क्लास' या शब्दाऐवजी 'डिप्रेस्ड कास्टस्' हा शब्दप्रयोग केला होता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तो स्विकारला तसेच महात्मा गांधी यांनी 'हरिजन' हा शब्द प्रयोग वापरला.[१] त्यावेळी या जातींचा उल्लेख करताना जास्त हिनत्व दर्शविणारा शब्द सरकारी पातळीवर वापरणे बरोबर नाही म्हणून राखीव जागासंबंधी आदेशाला जोडलेल्या परिशिष्टातील जाती या अर्थाने 'शेड्यूल्ड कास्टस्' म्हणजे परिशिष्ट किंवा अनुसूची हा शब्द वापरला जात असे. सन १९३५ मध्ये पार्लमेंटने मंजूर केलेल्या कायद्यातही शेड्यूल्ड कास्टस हा

शब्द वापरण्यास सुरुवात झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने राज्यघटनेत शेड्यूल्ड कास्टस या शब्दाचा उल्लेख करण्यात आला शेड्यूल्ड कास्टसचे मराठीत भाषांतर .'अनुसूचित जाती' असे करण्यात येते.[२]

भारतामध्ये सर्वप्रथम १८८१ साली जनगणना पार पडली. यानुसार निरनिराळया राज्यातील दलितांच्या आकडेवारीचे वर्णन केल्याचे दिसून येते. या जनगणनेत दलित जातीचे लोक हे खालच्या यादीत असत. दलित जाती व्यवसाय म्हणून शेतमजूर, चामड्याचे काम करणारे कामगार, गावकी काम करणारे कामगार, सफाई कामगार, पहारेकरी आणि खेड्यातील किरकोळ हलके काम करणारे अश्यांचा दलीत या श्रेणीत समावेश केला जात असे. १९३१ मध्ये अस्पृश्यांचा उल्लेख दलित म्हणून सर्वप्रथम केला आणि अनुसूचित जाती हा शब्द सर्वप्रथम एप्रिल १९३४ मध्ये वापरला गेला. इंग्रज सरकारने भारतासंबधी जो आदेश १९३६ मध्ये दिला त्यानुसार काही जाती, आणि जमाती या अनुसूचित जातीमध्ये गणल्या जाऊ लागल्या. या पूर्वी सदर लोकांचे गट मागासवर्गीय म्हणून ओळखले जात असत. या शब्दाचे मूळ १९३१ सालच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेला सादर केलेल्या प्रस्तावांमध्ये 'डिप्रेस्ड क्लास' असा उल्लेख केला होता. भारतीय राज्य घटनेमध्ये कलम ३३८ नुसार अनुसूचित जातीसाठी विशेष तरतुदीची सोय करण्यात येऊन अनुसूचितजाती संरक्षाणासाठी यंत्रणा निर्माण करून अनुसूचित जाती-जमाती आयोग स्थापन करण्यात आला. त्यानुसार भारतीय राज्य घटनेतील अनुसूचित जातीची यादी ही १९७८ नुसार प्रसिद्ध आहे.[३] यामध्ये एकोनसाठ जातीचा समावेश आहे.

सन च्या २०११ जनगणनेनुसार भारतातील आदिवासींचे एकूण लोकसंख्या ही १०.४५ कोटी असून भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ती ८.६ टक्के आहे त्यात आदिवासींच्या एकूण लोकसंख्येच्या ८९.९ टक्के लोकसंख्या ही जंगलात आणि डोंगरदऱ्यात वास्तव्यास असते. उर्वरित नगण्य आदिवासी लोकसंख्या ही शहरी भागात असल्याचे आढळून येते. महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवासी जमाती आढळून येतात. विशेषत: अंध, गोंड, भिल्ल, प्रधान, महादेव, कोळी, पावरा, कोकणा-कोकणी, वारली इत्यादी या प्रमुख जमातीची नावे आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार १.१५ लाख लोकसंख्या ही आदिवासींची लोकसंख्या महाराष्ट्रात असल्याचे दिसून आले हे प्रमाण ८.८ टक्के महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३३,६१,२९२ असून नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातींची एकूण लोकसंख्या ६,४०,४८३ जी एकूण लोकसंख्येच्या १९ टक्के आहे त्यामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या २,८१,६९५ आहे. जी एकूण लोकसंख्येच्या ८ टक्के आहे. तसेच भारतामध्ये महाराष्ट्र लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून महाराष्ट्राची लोकसंख्या ही ११.२३

कोटी आहे. महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या ही २४,५४,१९६ असून यामध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या ही ४,८०,९१३ असून अनुसूचित जमातींची लोकसंख्या ही ५७,४८८ आहे. म्हणजे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींची एकूण लोकसंख्या ही लातूर जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या २१.९ टक्के इतकी आहे. त्यामध्ये अनुसूचित जातीय १९.६ तर अनुसूचित जमाती या अल्पशा २.३ टक्के प्रमाणामध्ये आहेत.[४]

अनुसूचित जाती आणि जमातींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते त्यात मुख्ये समस्या पुढील प्रमाणे सामाजिक समस्या अस्पृश्य किंवा अनुसूचित जातींना ऐतिहासिकदृष्ट्या अनेक मर्यादा किंवा समस्या होत्या, हे मुद्दे दूषित आणि शुद्धतेच्या कल्पनांशी संबंधित होते. समाजात अस्पृश्यांना अतिशय खालचा दर्जा देण्यात आला होता, उच्च जातीच्या हिंदूंनी सामाजिक स्तरावर त्यांच्यापासून अंतर ठेवले. उच्चवर्णीय हिंदूंच्या विरोधात जीवनाच्या असंख्य गरजा त्यांच्यापासून रोखल्या गेल्या.[५] खाण्यापिण्याच्या बाबतीत ते हिंदू प्रथेवर अवलंबून होते, देशाच्या सध्याच्या कायद्यांतर्गत जातिव्यवस्था औपचारिकपणे संपुष्टात आली असली तरीही अस्पृश्यता अजूनही भारतात एक व्यापक प्रथा आहे, राजस्थानमधील बहुसंख्य गावे अनुसूचित जातीच्या सदस्यांना मंदिरात जाण्यास किंवा सार्वजनिक विहिरीचा वापर करण्यास मनाई करतात. आर्थिक समस्या या त्यांना अनेक आर्थिक समस्यांचा सामना करावा लागला. त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला आणि त्यांच्या सेवेसाठी त्यांना पुरेशी भरपाई मिळाली नाही, अस्पृश्यांना ऐतिहासिकदृष्ट्या त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर प्रवेश नाकारण्यात आला होता. त्यांना कोणताही व्यवसाय करण्यास मनाई होती, इतर जातीतील व्यक्ती करत असलेल्या कोणत्याही व्यवसायात त्यांना काम करण्यास मनाई होती, अस्पृश्यांना प्रचंड शेतीची कामे करणे, रस्त्यांची साफसफाई करणे, मृत जनावरे काढणे आणि त्यांच्या क्षमतेनुसार कोणतेही **काम** करणे आवश्यक होते, त्यापैकी बहुतेक मजूर होते ज्यांच्याकडे जमीन नव्हती. ते उच्च जातीच्या हिंदूंच्या मालकीच्या शेतात काम करायचे.[६]

सद्यस्थितीत भारत सरकार आणि राज्य सरकार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आर्थिक आणि सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना समानता, योजना डेअरी व पशुसंवर्धन प्रोत्साहन योजना,उद्योग आधार योजना तेसच सामाजिक न्याय विभागातील विविध महामंडळे या योजनांची मोठ्या प्रमाणावर सुरुवात केली आहे. त्या योजनांमध्ये सर्वात महत्त्वाची योजना म्हणून सद्यस्थितीमध्ये स्टँड अप इंडिया ही योजना त्यांना आर्थिक लाभ मिळून देऊन सामाजिक स्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

स्टँड अप इंडिया योजना परिचय

स्टँड अप इंडिया ही योजना भारत सरकारने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती व महिला यांच्या आर्थिक आणि सामाजिक सबलीकरणासाठी ५ एप्रिल २०१६ रोजी सुरू केली

आहे. या योजनेचा मुख्**ये** उद्देश अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व महिला यांना उद्योग क्षेत्रात संधी उपलब्ध करून देणे. त्यांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा सुधारून सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी ही योजना सुरु केली आहे. या योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला यांचे जीवनमान **उं**चावणे आणि त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे हा उद्देश समोर ठेवून ही योजना सुरु केली आहे.[६] या योजनेच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील व्यक्तींना आर्थिक मदत करून त्यांचे राहणीमान व जीवनशैली यात सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने ही योजना सुरु केलेली आहे.

योजनेची उद्दिष्ट्ये:

भारत सरकारने राबवलेल्या अनुसूचित जाती आणि जमातींसाठी च्या स्टँड अप इंडिया या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना उद्योजकते**मध्ये** प्रोत्साहन देऊन अर्थव्यवस्थेला चालना देणे, नवकल्पना आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे, सोप्या नियमाद्वारे स्टँडअपची नोंदणी प्रक्रिया सुलभ करणे, वित्तीय मदत कर सवलती आणि अनुदानाचा लाभ उपलब्ध करून देणे.[७] यामुळे अनुसूचित जातींना नवीन व्यवसाय थाटण्यासाठी मदत मिळणे सुलभ झाले आहे.

योजनेची वैशिष्ट्ये

अनुसूचित जाती आणि जमातीसाठी स्टँड अप इंडिया या योजनेतून लाभधारकांना दिल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या सुविधा स्वस्त कर्ज, सुलभ वित्तीय मदत देऊन सरकार स्टँड अपसाठी विशेष निधीची पूर्तता करतात, यानुसार मान्यता प्राप्त स्टँडअप इंडिया तीन वर्षासाठी कोणत्याही प्रकारचा कर आकारला जात नाही, या योजनेनुसार सर्वात जलद पोर्टलद्वारे सहज नोंदणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे तसेच प्रॉपर्टी राईटनुसार बौद्धिक संपदा नोंदवण्यासाठी सवलतीची सुलभ प्रक्रिया देण्यात येऊन यासाठी एक विशेष विविध सरकारी सेवा आणि खाजगी क्षेत्राशी समन्वय साधण्यासाठी खिडकी निर्माण करण्यात आलेली आहे.

योजनेचा वित्त पुरवठा

स्टँड अप इंडिया या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांना वित्त पुरवठा केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या मार्फत केला जातो या योजनेअंतर्गत लाभाची रक्कम ही कमीत कमी कर्जाच्या स्वरूपात १० लाख रुपये आणि जास्तीत जास्त १ कोटीपर्यंतचा कर्जपुरवठा खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील वित्त बँकांकडून केला जातो.[८]

योजनासाठीच्या वित्तय पुरवठा बँका:

स्टँड अप इंडिया या योजनेअंतर्गत वित्त पुरवठा करणाऱ्या बँका या सार्वजनिक क्षेत्रातील बँक आहेत आणि खाजगी क्षेत्रातील बँक आहेत त्या पुढील प्रमाणे.

अ. सार्वजनिक बँका: १. बँक ऑफ बडोदा (Bank of Baroda), २.बँक ऑफ इंडिया (Bank of India), ३. स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) ४. पंजाब नॅशनल बँक (PNB) ५. युनियन बँक ऑफ इंडिया (Union Bank of India) ६. इंडियन ओव्हरसीज बँक (Indian Overseas Bank) ७. कृषी विकास बँक (Agriculture Development Bank), ८. बँक ऑफ महाराष्ट्र (Bank of Maharashtra),९. कोल इंडिया बँक (Central Bank of India),१०. येरागेट बँक (Corporation Bank). ब. खाजगी बँका: १. HDFC बँक (HDFC Bank), २. ICICI बँक (ICICI Bank) ३. अक्सिस बँक (Axis Bank) ४. कोटक महिंद्रा बँक (Kotak Mahindra Bank) ५. IDFC First बँक (IDFC First Bank) ६. YES बँक (YES Bank) ७. इंडसइंड बँक (IndusInd Bank), ८. रिलायन्स बँक (Reliance Bank).[९]

योजनेची वाटचाल:

स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आणि महिला यांच्या विकासासाठी पूर्ण भारत देशात आतापर्यंत एकूण २,७५,८८६ अर्ज दाखल झाले असून त्यामध्ये २,५२,३५६ अर्जांना मंजुरी मिळालेली आहे. या योजनेनुसार आत्तापर्यंत एकूण ६४, ५४८.६२ कोटी रुपयाची रक्कम ही या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात आलेली आहे.[१०]

स्टँडअप इंडिया अंतर्गत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती मधील आतापर्यंत नोंदीत एकूण १,८०,६३६ असून त्यापैकी अनुसूचित जातीचे लाभार्थी २६,८००९ आहेत तर अनुसूचित जमातीचे लाभार्थी ८९६० आहेत या योजनेअंतर्गत सर्वाधिक लाभार्थी हे महिला लाभार्थी असून त्यांची संख्या १,४४,७८६ आहे. या योजनेमध्ये आर्थिक दुर्बल घटकांना या योजनेचा लाभ होऊन त्यांना एकूण रक्कम ही स्टँड अप इंडिया अंतर्गत अनुक्रमे ५,६२५ कोटी,१,९३२ कोटी, ३३,१५२ कोटी अशा स्वरूपात व्यवसाय उभारण्यासाठी रक्कम देण्यात आली.[११]

संशोधन साहित्याचा अभ्यास

संशोधन विषयाचा अभ्यास हा पूर्व संशोधनावर आधारित माहितीच्या आधारे केला जातो आणि पूर्व संशोधन साहित्याच्या आधारे त्या संशोधनातील अंतर शोधून नवीन संशोधन निर्माण करणे होय. प्रस्तुत संशोधन हे पुढील पूर्व संशोधन साहित्या **चा** अभ्यास करण्यात आला आहे.

१. थोरात सुखदेव (२००७)[१२] 'दलित निरंतर विषमता आणि दारिद्रय' या डॉ. सुखदेव थोरातांच्या पुस्तकामध्ये दलित समाजाची वास्तविकता कशा प्रकारची आहे ते सांख्यिकीय माहितीनुसार प्रकर्षाने मांडतांना दिसुन येतात. यामध्ये दलित निरंतर गरीब का आहे. या प्रश्नांची उत्तरे अनेक सामाजिक, आर्थिक दृष्टिकोनातून मांडतांना नेमके देशातील एकुण

गरीबांपैकी मोठ्या प्रमाणात गरीबी ही अनुसूचित जाती व जमातीमध्ये कशा प्रकारे आहे यांचा परामर्श घेतला आहे. भारताचा इतर समाजाच्या जातीयतेमुळे निर्माण झालेला भेदभाव आणि बहिष्कार यांचा अधिक दुष्परिणाम आरक्षित जातींना भोगावा लागला. अनुसूचित जाती व जमाती समस्या इतर वंचित गटा पेक्षा वेगळी आहे. पुर्वीपासुन चालत आलेल्या रितीरिवाजानुसार विचार करता या जातीवर झालेल्या सामाजिक व आर्थिक बहिष्कार हे मानवी विकासाच्या दृष्टिने मोजले तर ते अधिक भीषण स्वरुपामध्ये भारतीय समाजव्यवस्थेमध्ये होते. यात विषमता मोठ्या प्रमाणात दिसुन येते. त्यामुळे भारतीय सर्वच दलितांची सामाजिक सुरक्षितता बद्दल निश्चित भुमिका कशा पध्दतीने असली पाहिजे यांची मुद्देसूद मांडणी लेखकांनी केली आहे.

२. नाडगोंडे गुरुनाथ (२००३)[१३] "भारतीय आदिवासी" या ग्रंथाच्या लिखाणात असे विषद केले की, महाराष्ट्रातील समाजाचे अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे. यांत आदिम समाजाचा संपूर्ण आर्थिक, सामाजिक जीवनाचा वेध घेतला असून भारतीय आदिवासींचे वर्गीकरण त्यांच्या सामाजिक, चालिरीती, सांस्कृतिकदृष्टया, भौगोलिक, भाषिक, वांशिक, आर्थिक इ. बद्दल मांडणी करतांना भारताच्या संदर्भात महत्वपूर्ण अशी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मांडणी केली आहे. त्यामुळे भारतातील आदिवासी समाजाची सामाजिक आणि आर्थिक घडण कशी आहे. याबद्दलची यथार्थ माहिती आहे. २१ व्या शतकातील आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक समस्या गुरुनाथ नाडगोंडे यांनी समस्यांची वास्तविकतेची व्यापक मांडणी केली आहे. त्यामुळे ब्रिटीश काळापासुन ते आधुनिक काळापर्यंत आदिवासींचे प्रश्न कसे निर्माण होत गेले त्यात आधुनिकतेनुसार नेमके काय बदल झाले त्याचप्रमाणे आदिम संस्कृतीचा होणारा ऱ्हास कशा प्रकारे झाला आहे. यात निर्माण होणारे प्रश्न वनजमिनी, वनहक्क, औद्योगिकरण, व्यसनाधिनता, शैक्षणिक, आरोग्य इ. प्रश्नांची मांडणी ही आदिवासींच्या वास्तविकतेची जाण निर्माण करणारी आहे. त्यामुळे आर्थिक सामाजिक समस्या तर आहेतच त्यावर निश्चितपणे उपाययोजना कशा प्रकारे असणे गरजेचे आहे. त्यात कल्याणकारी राज्याच्या भुमिकेचे ही विश्लेषण होणे आता काळाची गरज आहे.

आदिवासीचा उपाययोजने अंतर्गत भारतामध्ये आदिवासीसाठी कल्याण कार्यक्रम कशा प्रकारे आहे. यांचा मागोवा घेण्याचा दृष्टीने आदिम आदिवासी कल्याण कार्यक्रम यात स्वातंत्र्यपूर्व काळ यात ब्रिटीश सरकारने दिलेले कार्यक्रम व स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये भारतीय राज्यघटनेच्या विशेष तरतूदीमुळे करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाविषयी सविस्तर आढावा सदर पुस्तकातून घेतला आहे. यात कल्याणकारी राज्य व्यवस्था कशा प्रकारे काम करीत आहे. महाराष्ट्रातील आदिवासी कल्याण कार्यक्रमाची व्याप्ती व स्वरुप कशा पध्दतीने आहे. यात,

सामाजिक व आर्थिक पैलूंचा योग्य समन्वय साधुन निर्माण करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची ओळख करुन देऊन या संपूर्ण कल्याण कार्यक्रमाची योग्य पध्दतीने मुल्यमापन ही करण्याचा प्रयत्न करुन आदिवासी कल्याण कार्यक्रमाची निश्चित दिशा देण्याचे काम सदर पुस्तकातून केले आहे. थोडक्यात, सदर पुस्तकामध्ये आर्थिक व समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आदिवासी समाजाचे संपूर्ण सामाजिक व आर्थिक, सांस्कृतिक पैलूंचा उलगडा हा केलेला आहे.

३. **काकडे सुरेश (२००८)**[१४.] काकडे सुरेश यांच्या “Development of Scheduled Castes and Scheduled Tribes In India” या संशोधन प्रबंधानुसार जागतीकीकरण आणि अनुसुचित जाती या शोध अभ्यासामध्ये लेखकांने सुरुवातीच्या प्रस्तावनेमध्ये मांडणी करतांना जगातील सर्वच देशांमध्ये मानवी जीवनाचा सर्वच पैलुवर जागतीकीकरणाने एक लक्षणीय प्रभाव टाकलेला आहे. ही प्रक्रिया अत्यंत महत्वाची आहे. भारतीय समाजाच्या सर्व समुदाया वरील यांच्या प्रभावाचे स्वरुप आहे. त्याच दृष्टीने विकसित राष्ट्रावर प्रभाव सकारात्मक आहे. भारताच्या दृष्टीने यांचे स्वरुप सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक तसेच नैतिक देखील आहे. जागतिकीकरण हे वैश्विक असल्यामुळे नैसर्गिकपणे त्यामध्ये स्पर्धा आणि गुणवत्तेचा समावेश होतो. कोनिही या मधुन सुटु शकत नाही. सुदैवाने भारतीय समाजात या क्षमता आहेत.

भारतीय समाज हा धर्मजात वर्गावर आधारीत घटकांचा मिळुन तयार झालेला समाज आहे. या बहुजिनसी समाजाच्या विविध गटाच्या विविध समस्या आहेत. स्वातंत्र्याच्या ६० वर्षानंतर देखील अनेक समाजघटकांमध्ये समाजस्पर्धेच्या आव्हानांना तोंड देण्याची कुवत विकसित झालेली नाही. अजुनही त्यांना कल्याणकारी राज्याच्या सकारात्मक पाठिब्यांची गरज आहे. या दृष्टीकोनातुन विचार करता हे गरजेचे आहे की दुर्बल घटकांचे सबलीकरण आणि त्याच्यात या स्पर्धेला सामोरे जाण्याच्या गुणवत्तेचे संपादन यात समतोल गरजेचा आहे.

अनुसुचित जातीचे मागसलेपणा, बेरोजगारी, शेतीवरील अवलंबित्व, निरक्षरता आणि सामाजिक दृष्ट्या विभागलेली स्थिती यातुन दिसुन येते. त्यांच्या दारिद्रय आणि अस्वच्छ राहणीमानामुळे त्यांना कुपोषणाला, शारीरिक दुर्बलतेला आणि अनारोग्यास सामोरे जावे लागते. संविधानातील तरतुदी स्वातंत्र्या नंतरच्या राजकीय प्रक्रिया आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा प्रभाव यामुळे त्यांच्या जीवनमानात बदल घडत आहेत. यामध्ये विशेष करुन नवबौध्दांच्या जीवनात. तसेच ते समाजातील स्थानाबद्दल जागरुक होत आहेत.

दलितांच्या कल्याणासाठी आर्थिक अंदाज पत्रकात असलेला खर्च कमी झालेला आहे. त्यांच्यासाठी असलेला निधी दुसऱ्या विभागांकडे वर्ग केला जातो. नियोजन आयोगाने दलितांचा विकास कार्यक्रमासाठी २२% निधी आरक्षित करण्याचे निर्धारीत केले असुन यात वित्त विभाग यावर फारसे गार्भीयाने घेत नाही. १६,१६६ कोटी रुपयांपैकी फक्त १.९४० कोटी रु. खर्च केले आहे.

प्रस्तुत संशोधन साहित्याच्या अभ्यासांती असे दिसून आले की या पूर्वी झालेले संशोधन आणि लिखाण यांच्या माध्यमातून अनुसूचित जाती आणि जमात्ती च्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला. परंतू सरकारी योजनातून विशेष अनुसूचीतील जाती आणि जमाती विकासासाठी आर्थिक लाभाच्या विशेष योजन यापूर्वी अस्थित्वात आल्या असल्या तरी त्यांची अनुसूचित जाती आणि जमातीला सरळ लाभ देण्यासाठीची प्रथम योजना निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रस्तुत "स्टँड अप इंडिया योजनेचे अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासातील योगदानाचा तुलनात्मक अभ्यास (विशेष संदर्भ लातूर व नांदेड जिल्हा)" या संशोधनाच्या अभ्यासातून स्टँड अप इंडिया योजनेची फलनिष्पती अभ्यासता येईल.

संशोधन समस्या

प्रस्तुत "स्टँड अप इंडिया योजनेचे अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासातील योगदानाचा तुलनात्मक अभ्यास (विशेष संदर्भ लातूर व नांदेड जिल्हा)" संशोधनातून अनुसूचित जातींच्या आणि जमातींच्या सामाजिक आणि आर्थिक विकासामध्ये शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या फलनिष्पत्तीचा अभ्यास करून प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या स्टँड अप इंडिया या शासनाच्या योजनेचा अनुसूचित जातींच्या आणि जमातींच्या सामाजिक आर्थिक विकासावर कोणकोणत्या पद्धतीने परिणाम झालेला आहे याचा अभ्यास करण्यात येईल. संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी समाजातील अती मागास घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनुसूचित जाती आणि जमाती या घटकांची निवड केली असून त्यांना समाजाच्या मूळ सामाजिक आणि आर्थिक प्रवाहात आणण्यासाठी शासनाने निर्माण केलेली स्टँड अप इंडिया योजना ही कितपत शासनाचे उद्दिष्ट साध्**ये** करत आहे याचा शोध घेणे. स्टँड अप इंडिया योजना ही समाजातील महिला, अनुसूचित जाती आणि जमातींच्या विकासासाठी निर्माण केलेली योजना असून या योजनेचा दुसरा हेतू म्हणजे या समाजातील वंचित घटकांना उद्योजक बनवून त्यांना आर्थिक विकासाच्या नवनवीन संधी निर्माण करून देणे व त्यांना आर्थिक सक्षम बनवणे. अनुसूचित जाती आणि जमातींचा मूळ सांस्कृतिक व्यवसायाचा जागतिक पातळीवर उद्घोष करण्यासाठी निर्माण झालेली स्टँड अप इंडिया योजना ही आदिवासींच्या मूळ व्यवसायांना आणि व्यवसाय निहाय जाती निर्माण झालेल्या अनुसूचित जातींना जागतिक स्तरावर व्यवसायाच्या नवीन संधी उपलब्ध करून देते का? या प्रश्नाची उकल करण्यासाठी प्रस्तुत "स्टँड अप इंडिया योजनेचे अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासातील योगदानाचा तुलनात्मक अभ्यास (विशेष संदर्भ लातूर व नांदेड जिल्हा)" संशोधन समस्या निवडण्यात आली आहे .

संशोधनाचे महत्व:

अनुसूचित जाती व जमाती प्राचीन काळापासून सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास राहिलेल्या आहेत. त्यांना आर्थिक विकासाच्या संधी या खूपच कमी प्रमाणात मिळत आल्या असून त्यामधून अनुसूचित जाती व जमातींना स्वतःचा सामाजिक विकास घडून आणणे कितपत शक्य झाले हे पाहण्याच्या दृष्टिकोनातून प्रस्तुत संशोधनाची रूपरेषा मांडण्यात आलेली आहे. शासनाने अनुसूचित जाती जमातींच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी स्टँड अप इंडिया ही धोरणात्मक योजना राबवून विकास घडवून आणण्याचा प्रयत्न कितपत यशस्वी ठरला आहे. शासनातर्फे निर्माण केलेली स्टँड अप योजना ही अनुसूचित जाती आणि जमातींचा सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी यशस्वी ठरत आहे का? सन २०१६ ते २०२४ या कालवधी दरम्यान अनुसूचित जाती आणि जमातींच्या सामाजिक व आर्थिक विकास या योजनेच्या लाभांमुळे कितपत शक्य झाला आहे? नांदेड जिल्ह्यात अनुसूचित जाती आणि जमातींची लोकसंख्या मोठ्या प्रमाणामध्ये असल्याने या जिल्ह्यांमध्ये राबवण्यात आलेली स्टँड अप इंडिया ही योजना रोजगार निर्मितीसाठी यशस्वी ठरली आहे का? स्टँड अप इंडिया या योजनेचे मूळ उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनुसूचित जाती आणि जमातींना त्यांच्या मूळ व्यवसायामध्ये सहभाग नोंदवण्यासाठी आणि त्यांना उद्योजक बनवण्यासाठी या योजनेतून कोण कोणत्या प्रकारचे कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत .या योजनेच्या फलनिष्पत्तीतून अनुसूचित जातीं जमातींचा अधिकाधिक आर्थिक व सामाजिक विकास साधता यावा यासाठी योजनाकरांनी शिफारशींचा योग्य अर्थ लावून योजना निर्मितीसाठी प्रस्तुत संशोधनाचा लाभ होईल इत्यादी उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषय संशोधनासाठी निवडण्यात आलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. भारत सरकाच्या स्टँड अप इंडिया योजनेचा अभ्यास करणे.

२. लातूर व नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती-जमातींच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीचे अध्ययन करणे.

३. लातूर व नांदेड जिल्ह्यातील स्टँड अप इंडिया योजनेचा अनुसूचित जाती जमातींच्या विकासावरील परिणामाचे तुलनात्मक परीक्षण करणे.

४. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती जमाती-स्टँड अप इंडिया या योजनेमुळे निर्माण झालेल्या व्यवसाय संधींची पाहणी करणे.

५. स्टँड अप इंडिया योजनेमुळे अनुसूचित जाती जमातींना निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधीचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहीतके

१. लातूर व नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती व -जमातींच्या सामाजिक आर्थिक परिस्थिती सुधारण्यामध्ये स्टँड अप इंडिया योजनेची भूमिका असमाधानकारक दिसून येते.

२. लातूर व नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती जमातीच्या आर्थिक विकासामध्ये स्टँडअप इंडिया योजनेमुळे अल्प प्रमाणात भर **पडत** आहे.

३. लातूर व नांदेड जिल्ह्यातील स्टँड अप इंडिया योजनेचा अनुसूचित जाती जमातींच्या पारंपारिक व्यवसायामध्ये परिणाम झाला आहे.

४. स्टँड अप इंडिया योजनेमुळे अनुसूचित जाती जमातींना नवीन व्यवसाय करण्यास वाव मिळतो.

५. लातूर व नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती जमातींना-स्टँड अप इंडिया योजनेमुळे निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधीं अल्प प्रमाणात आहेत.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीच्या आधारे माहिती संकलित करण्यात येणार आहे.

अ) प्राथमिक सामग्री

प्रस्तुत "स्टँड अप इंडिया योजनेचे अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासातील योगदानाचा तुलनात्मक अभ्यास (विशेष संदर्भ लातूर व नांदेड जिल्हा)" हा विषय संशोधन कार्यासाठी निवडण्यात येणार असून या अभ्यासासाठी प्रश्नावली, मुलाखत अनुसूची, निरीक्षण, सर्वेक्षण, या पद्धतीचा वापर माहिती संकलित करण्यात येईल.

ब) दुय्यम सामग्री:

प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी माहिती संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, शोधनिबंध, इंटरनेट, विविध अप्रकाशित साहित्य,शासनाचे वार्षिक अहवाल इत्यादी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे

नमुना निवड:

या संशोधनासाठी सहेतुक नमुना या पद्धतीचा वापर करण्यात येणार असून सामग्रीचे संकलन करण्यासाठी लातूर जिल्ह्यातील १५० व नांदेड जिल्ह्यातील १५० असे प्रत्यक्ष योजनेचा लाभ घेणाऱ्या एकूण ३०० उद्योजकांची नमुना म्हणून निवड केली जाईल.

संशोधन तंत्र:

माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, मध्यमान, सहसंबंध, आलेख, इत्यादी सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच SPSS संगणक सॉफ्टवेअरचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती:

प्रस्तुत संशोधन "स्टँड अप इंडिया योजनेचे अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासातील योगदानाचा तुलनात्मक अभ्यास (विशेष संदर्भ लातूर व नांदेड जिल्हा)" असून लातूर व नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती जमातींच्या-सामाजिक आर्थिक विकासात स्टँडअप इंडिया योजनेचा सन २०१६ ते २०२४ या कालखं**डातील** परिणाम अभ्यासण्यात येईल. या स्टँडअप इंडिया याजानेचा लातूर व नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती आणि जमातीवरील परिणामाच्या दृष्टीने संशोधनाची व्याप्ती असेल.

संशोधन अभ्यासाची मर्यादा:

प्रस्तुत संशोधन हे "स्टँड अप इंडिया योजनेचे अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासातील योगदानाचा तुलनात्मक अभ्यास (विशेष संदर्भ लातूर व नांदेड जिल्हा) असून भारत सरकार **कडून** मागास प्रवर्गाच्या**आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी** देश पातळीवर स्टँड अप इंडिया योजना राबवली जात आहे. प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील नांदेड आणि लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती जमातींच्या-सामजिक-आर्थिक दृष्टीकोनातून संशोधनामध्ये अभ्यास करण्यात येईल. सदरील संशोधनासाठी संशोधकाने २०१६ ते २०२४ **हा** कालखंड निवडण्यात येईल. तसेच प्रस्तुत संशोधन हे लातूर **आणि** नांदेड जिल्ह्यातील स्टँडअप इंडिया योजनेअंतर्गत झालेल्या आर्थिक परिणामांच्या संबंधा पुरताच मर्यादित राहील.

प्रकरणाची रूपरेषा:

प्रकरण पहिले : प्रस्तावना.

प्रकरण दुसरे : पूर्व संशोधन साहित्याचे पुनरावलोकन.

प्रकरण तिसरे : **अनुसूचित जाती व जमाती यांचा** आर्थिक व सामाजिक अभ्यास.

प्रकरण चौथे : तथ्यांचे विश्लेषण.

प्रकरण पाचवे: निष्कर्ष व शिफारशी.

संदर्भसूची:

१. शेलकर, अभया. २००४. अनुसुचीत जाती व जमातीचे कायदे, औरंगाबाद, नासिक लॉ हाऊस,पृष्ठ क्र.३६.

२. कुलकर्णी, एम. जी. १९८७. भारतीय समाजव्यवस्था, परिमल प्रकाशन. औरंगाबाद. पृ. क्र. ८ ते २५

३. कित्ता पृ. क्र. २८ ते ३६.

४. भारत सरकार जनगणना २०११. संकेत स्थळ दिनांक १०/१२/२०२४.

५. वाघमारे, वसंत. २००६. जाती व्यवस्था निर्मिती आणि स्वरूप. सुगावा प्रकाशन, पुणे. पृ.क्र. ११ ते २९.

६. कित्ता पृ. क्र. ३९.

७. स्टँडअप इंडिया मित्रा संकेत स्थळ दिनांक ०४/१२/२०२४

८. स्टँडअप इंडिया मित्रा संकेत स्थळ दिनांक ०५/१२/२०२४

९. स्टँडअप इंडिया मित्रा संकेत स्थळ दिनांक ०६/१२/२०२४

१०. स्टँडअप इंडिया मित्रा संकेत स्थळ दिनांक ०७/१२/२०२४

११. स्टँडअप इंडिया मित्रा संकेत स्थळ दिनांक १२/१२/२०२४

१२. डॉ. थोरात सुखदेव प्रथमावृत्ती डिसेंबर २००७, दलित निरंतर विषमता आणि दारिद्रय. सुगावा प्रकाशन. पुणे. ३०.

१३. नाडगोंडे, गुरुनाथ. २००३. भारतीय आदिवासी. कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.

१४. काकडे सुरेश. २००८. “Development of Scheduled Castes and Scheduled Tribes In India” Globalization and Scheduled Castes " Cambridge Scholars Publishing New castle UK.

संशोधक

किरण निवृत्ती देवकरे

मार्गदर्शक

डॉ. ठाकूर विलास तुळशीराम

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

श्री शिवाजी महाविद्यालय, कंधार.